www.rtmnuonline.com



**Bachelor of Arts (B.A.) Part-II (Third Semester) Examination**

**MARATHI**

**(Optional)**

**(Literature)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—** (1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.
(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. संत वाङ्मयाचा इतिहास तुमच्या शब्दांत रेखाटा. 16

**किंवा**

संत तुकारामांच्या समाज प्रबोधनविषयक अभंगांचे स्पष्टीकरण करा.

2. संत कवींच्या काळातील सामाजिक परिस्थितीचा आढावा घ्या. 16

**किंवा**

संत तुकारामांच्या भक्तिविषयक अभंगांचे विवेचन करा.

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील वाक्यांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा : 16

**गट 'अ'**

(क) "वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें,
पक्षी ही सुस्वरें आळविती.
येणें सुखें रूचें एकांताचा वास,
नाहीं गुण दोष अंगा येते."

(ख) "हें चि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा.
गुण गाईन आवडी, हे चि माझी सर्व जोडी."

www.a2zsubjects.com

(ग) "तरूवर बीजा पोटीं, बीज तरूवरा सेवटीं.
तेंसें तुम्हां आम्हां जालें, एकीं एक सामावले."

(घ) "भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा
तेथें अनुभवाचा काय पंथ.
वाठवुनी जटा फिरे दाही दिशा,
तरी जंबुवेशा सहजस्थिती."

**किंवा**

**गट 'ब'**

(च) "जें कां रंजलें गांजलें, त्यासि म्हणे जो आपुलें.
तो चि साधु ओळखावा, देव तेथें चि जाणावा."

(छ) "अर्थेविण पाठांतर कासया करावें,
व्यर्थ चि मरावे घोकूनियां.
घोकूनिया काय, वेगीं अर्थ पाहे,
अर्थरूप राहे होऊनियां."

(ज) "अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती,
तयाचिये मती बोध कैंचा
अज्ञानाची पूजा कामिक भावना,
तयाचिया ध्याना देव कैंचा."



www.rtmnuonline.com

www.rtmnuonline.com

(झ) "जोडोनिया धन उत्तम वेव्हारें,
उदास विचारें वेच करी.
उत्तम चि गती तो एक पावेल,
उत्तम भोगील जीव खाणी."

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा : 16

**गट 'क'**

(त) संस्कृत काव्यमिमांसक 'मम्मट' यांची काव्यविषयक भूमिका स्पष्ट करा.

(थ) 'ध्वनि हा काव्याचा आत्मा आहे' हे आनंदवर्धनाचे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

(द) 'व्यवहारज्ञान' या काव्यप्रयोजनाचे स्वरूप सांगा.

(ध) 'उपदेश, बोध आणि ज्ञानदान हे साहित्याचे महत्त्वाचे प्रयोजन आहे' या विधानाची समर्पकता पटवून द्या.

**किंवा**

**गट 'ड'**

(प) 'रीती' या काव्यतत्त्वाचे महत्व पटवून द्या.

(फ) 'काव्य व नाट्य' या संकल्पनांचे स्पष्टीकरण करा.

(ब) 'आल्हाद किंवा आनंद' या काव्यप्रयोजनाची चर्चा करा.

(भ) भामहाने सांगितलेल्या काव्यप्रयोजनांचे विवेचन करा.

5. सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : 16

(1) संत तुकारामांना गुरुपदेश कधी व कसा झाला ?

(2) तुकारामाचा पर्यावरण विषयक दृष्टिकोण स्पष्ट करा.

(3) "न देखवे डोळा ऐसा हा आकांत, परपीडे चित्त दु:खी होतें." या ओळीचा अर्थ स्पष्ट करा. www.a2zsubjects.com

(4) 'चंदनाचे हात पाय ही चंदन ................' ही ओळ पूर्ण करा.

(5) काव्याच्या कोणत्याही दोन व्याख्या लिहा.

(6) वामनाने कोणला काव्यतत्त्वाचा पुरस्कार केला ?

(7) मम्मटाने सांगितलेली काव्यप्रयोजने कोणती ? ते लिहा.

(8) 'अशुभनिवारण' या काव्यप्रयोजनासंदर्भात आपले मत सांगा.


www.rtmnuonline.com